# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## अपील क्र.CIC- ०१७०/२०२६ ते ०१८१/२०२६

ॲड.केशव साहेबराव राजेनिंबाळकर,
२/२, निवारा बिल्डींग-२, सहयोग नगर,
मु.जिल्हा बीड-४३१ १२२.

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जांवर आज संयुक्तपणे सुनावणी घेण्यात येत आहे. यात अपिलार्थींनी राज्य माहिती आयोग मुख्यालय, बृहन्मुंबई खंडपीठ, कोकण खंडपीठ, अमरावती खंडपीठ, नागपूर खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ, पुणे खंडपीठ व नाशिक खंडपीठ येथे दाखल केलेल्या **एकूण १५६० द्वितीय अपील** अर्जांवर संयुक्तपणे सुनावणी घेण्यात येत आहे.

वरील सर्व खंडपीठांकडे दाखल केलेल्या द्वितीय अपील अर्जात अपिलार्थी श्री.निंबाळकर यांनी या सर्व प्रलंबित द्वितीय अपील अर्जांची सुनावणी ही राज्य माहिती आयोग, मुख्यालय येथे घेण्यात यावी तसेच त्यांचे सर्व अपील अर्ज हे मुख्यालयाकडे हस्तांतरित करण्यात यावेत अशी स्वतःच विनंती केली होती. सदर माहिती अर्जात अपिलार्थींनी **खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली आहे :-**

सन २००० ते आज पर्यंत या विभागांतर्गत राज्यातील सर्व जिल्हानिहाय, तालुकानिहाय विभाग व उपविभागनिहाय वर्ग-१ ते वर्ग-४ सर्व कर्मचारी यांची पदोन्नती, बदली व इतर तत्सम लाभ घेतल्यामुळे अपंग कायदा १९९५ च्या कलम ६२, ६३ व ४७ अन्वये सदर कर्मचाऱ्यांचे दिव्यांगाचे ऑनलाईन सर्टिफिकेट, युनिक डिसॅबिलिटी कार्ड, स्टेट आयडी नंबर, वितरित केलेली तारीख यांची माहिती मिळणे बाबत.

त्यानुसार अपिलार्थींनी दाखल केलेल्या उपरोक्त सर्व अपील अर्जांवर आज सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. त्यात मंत्रालय व महाराष्ट्र शासनाचे **विविध विभाग यांच्याविरुद्ध दाखल १६८ द्वितीय अपील अर्ज, कोकण खंडपीठाकडे दाखल ६८ द्वितीय अपील अर्ज, मुंबई खंडपीठात दाखल ११४ द्वितीय अपील अर्ज, अमरावती खंडपीठाकडे ८६ द्वितीय अपील अर्ज, नागपूर खंडपीठाकडे १६४ द्वितीय अपील अर्ज, छत्रपती संभाजी नगर खंडपीठ यांच्याकडे ३२५ द्वितीय अपील अर्ज, नाशिक खंडपीठाकडे २०३ द्वितीय अपील अर्ज तसेच पुणे खंडपीठाकडे देखील ४३३ द्वितीय अपील अर्ज** दाखल केले असून आज संयुक्त सुनावणी करिता ठेवण्यात आलेले आहेत.

वरील सर्व प्रकरणात अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर हे व्यक्तिशः हजर असून खंडपीठ निहाय दाखल अर्जांमधील त्या त्या विभागातील जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी हे व्यक्तिशः तसेच ऑनलाईन पद्धतीने सुनावणीस हजर आहेत.

अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी यातील जवळजवळ ९०० च्या वर प्रकरणांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सेवेमध्ये दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे अथवा आधीच्या अपंग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरीचा लाभ, पदोन्नती, बदली व इतर तत्सम लाभ घेतल्याने अपंग कायदा १९९५ च्या कलम ६२, ६३ व ४७ अन्वये सदर कर्मचाऱ्यांची दिव्यांगत्वाचे ऑनलाईन सर्टिफिकेट, युनिक डिसॅबिलिटी कार्ड, स्टेट आयडी नंबर, वितरित केलेली तारीख यांची माहिती मागितलेली आहे. यातील बहुतांशी प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींचे **जोडपत्र अ** प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या कार्यालयात कार्यरत दिव्यांग कर्मचारी यांच्या संदर्भातील दिव्यांग प्रमाणपत्र व इतर माहिती प्रदान करण्यात आली असल्याचे नमूद केलेले आहे.

अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी या संदर्भात बऱ्याच प्रकरणात माहिती मिळाली असली तरी बहुतांशी प्रकरणात माहिती प्रदान करण्यात आली नसल्याचे नमूद केलेले आहे. यातील अनेक प्रकरणांमध्ये जन माहिती अधिकारी स्तरावरच कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती त्यांना या आधीच प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच बहुतांशी प्रकरणात प्रथम अपील अर्जाची सुनावणी सूचना प्रदान करण्यात आली. तसेच त्यावर सुनावणी घेऊन सविस्तर व सम्यक आदेश देखील प्रदान करण्यात आला असल्याचे आढळून येते.

बहुतेक सर्व जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थी श्री.निंबाळकर हे प्रथमतः माहिती अर्ज दाखल करतात व त्यानंतर जन माहिती अधिकाऱ्यांचा प्रतिसाद प्राप्त झाल्यानंतर कुठलेही शुल्क न भरता तांत्रिक गोष्टींचा आधार घेत अपील अर्ज दाखल करतात व त्यानंतर अपिलीय सुनावणीस कधीच हजर राहत नाहीत अशा प्रकारची तक्रार केली असून श्री.निंबाळकर हे फार मोठ्या संख्येने **जोडपत्र अ** दाखल करीत असतात व कार्यालयीन कामकाजावर त्याचा अतिशय विपरीत परिणाम पडत असल्याचेही यात नमूद केलेले आहे. उदाहरणार्थ:-

आदिवासी विकास विभागांतर्गत सर्वच खंडपीठांच्या अखत्यारीतील अप्पर आयुक्त, आदिवासी विकास या कार्यालयामार्फत सन २००० ते आज पर्यंत राज्यातील सर्व जिल्हानिहाय, तालुकानिहाय, विभाग व उपविभागनिहाय वर्ग-१ ते वर्ग-४ यातील सर्व कर्मचाऱ्यांची दिव्यांग प्रमाणपत्र व इतर माहिती अपिलार्थीनी मागितलेली आहे. तसेच मंत्रालयातील अनेक विभागांमध्ये त्या विभागांतर्गत संपूर्ण राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक विभागात व उपविभागात अशाप्रकारे नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची माहितीही त्यांनी मागितली असून यातील बहुतांशी प्रकरणी **कलम ६ (३)** नुसार **जोडपत्र अ** हे त्या त्या जिल्ह्यांमधून जन माहिती अधिकारी यांच्याकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. मात्र असे करीत असताना प्रशासनावर पडणारा ताण ही बाब दुर्लक्षित करण्याजोगी नाही. याबाबतीत अपिलार्थी श्री.निंबाळकर यांना विचारणा केली असता त्यांनी मागितलेल्या माहितीत कुठलाच वैयक्तिक हेतू नसून ते स्वतःही दिव्यांग संवर्गातील असून सुयोग्य व पात्र व्यक्ती ही ज्या संवर्गासाठी असेल व त्यातील विविध प्राधिकरण येथे पदभरती करण्यात येते त्यातून ज्या ज्या संवर्गासाठी ज्या जागा राखीव आहेत तेथे पात्र व सुयोग्य उमेदवारांची निवड होते किंवा कसे, याची पदभरती करण्यात प्राधिकरणाशिवाय **सार्वजनिक अंकेक्षण (Public Audit)** होणे आवश्यक असल्याने तसेच ज्यांना विशेष सूट दिली जात आहे अशा संवर्गाविषयी म्हणजेच दिव्यांग, क्रीडा व विशिष्ट संवर्गातील उमेदवार यांनी सादर केलेली प्रमाणपत्रं याबाबत मागील काही वर्षांपासून उद्भवलेले वाद तसेच काही प्रकरणांमध्ये खोटे, बनावटी किंवा दिशाभूल करणारी प्रमाणपत्रे सादर होण्याच्या घडलेल्या घटना लक्षात घेता अशा संवर्गांमधील व्यक्तींनी सादर केलेली प्रमाणपत्रे ही त्यांच्या नियुक्ती आदेशाबरोबरच सार्वजनिक संकेतस्थळावर उपलब्ध करून देणेबाबत निर्देश देण्याची विनंती अपिलार्थीनी केली असून यासंदर्भात राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती येथे तक्रार क्रमांक ३२/२०२४ यावर दिनांक २१/०३/२०२४ रोजी पारित आदेशाची प्रत देखील अपिलार्थीनी यातील प्रत्येक द्वितीय **अपील अर्जासोबत जोडली असून त्यातील महत्त्वाचा भाग हा खालील प्रमाणे आहे:-**

तसेच प्रस्तुत प्रकरणी, दाखल केलेल्या **जोडपत्र अ** मध्ये अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी मागितलेली माहिती ही आपल्या अधिनस्त कार्यालयात दिव्यांग या संदर्भातील नियुक्ती झालेल्या व्यक्ती विषयी असल्यामुळे अशा संवर्गातील नियुक्ती देतांना संबंधित व्यक्तीने सादर केलेली प्रमाणपत्रे, युनिक डिसॅबिलिटी कार्ड, स्टेट आयडी नंबर, वितरित केलेली तारीख **(Unique Disability ID Card)**, व इतर कागदपत्रांची मागणी केली असून, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी मागणी केलेली माहिती ही शासकिय सेवेमध्ये दिव्यांग संवर्गातून रुजू झालेल्या व्यक्ती संदर्भात असल्यामुळे शासनाच्या धोरणानूसार योग्य व पात्र उमेदवारांना त्या त्या संवर्गासाठी राखीव असलेल्या जागांना प्रवेश मिळाले किंवा कसे हे जाणून घेण्याचा अधिकार हा नागरिकांना आहे व त्यामुळे अपिलार्थी ॲड.केशव राजे निंबाळकर यांनी दाखल केलेला प्रस्तुत **जोडपत्र अ** मधील माहिती ही खरं तर **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** मधील **कलम ४ (१)** नूसार

स्वयंप्रेरणेने उघड करणे अपेक्षीत असून, या बाबतीत मा.सर्वोच्च न्यायालय यांनी **रिट पिटीशन (सिव्हील) 990/2021 किशनचंद जैन विरुद्ध युनियन बँक ऑफ इंडीया यात दि.१७.०८.२०२३** रोजी दिलेल्या आदेशात सर्वच सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांचे अखत्यारित असलेली माहिती **(Information: Held by Such Authorities)** ही स्वयंप्रेरणेने उघड करुन शक्यतो स्वतःच्या अधिकृत संकेतस्थळावर अथवा कार्यालयात नागरिकांना ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी उपलब्ध करुन देणे हे बंधनकारक असून, संबंधित माहिती अर्जाचा विषय हा दिव्यांग संवर्गातून शासकिय सेवेत रुजू झालेल्या उमेदवाराविषयी असल्याने त्यासंबंधीत उमेदवारांची दिव्यांग संवर्गात असल्याविषयीची कागदपत्रे ही प्रथमदर्शनी **कलम ८ (१) (त्र)** अन्वये खाजगीपणाच्या हक्कावर हस्तक्षेप करित असेल, असे वाटत असले तरी ती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित हे **कलम ८ (२)** च्या तरतुदीनुसार अधिक व्यापक असल्याने व अशी माहिती प्रकट केल्याने साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधास होणाऱ्या हानिपेक्षा अधिक असेल तर, ती जन माहिती अधिकारी यांना उघड करण्याची कायद्यातील तरतूद लक्षात घेता, विषयांकीत माहिती ही शासकिय सेवा, त्यात झालेली भरती व विशिष्ट दिव्यांग संवर्गातून उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार देण्यात आलेली सूट याबाबतीतील असून अशा पदांवर नियुक्त झालेले उमेदवार हे त्या संवर्गातीलच असल्याविषयी त्यांनी सादर केलेली कागदपत्रे ही खाजगी स्वरुपाची असू शकत नाहीत. त्यामुळे वरील कागदपत्रे ही संबंधित प्राधिकरणाने केवळ अपिलार्थीस देणे अपेक्षित नसून, ती स्वतःच्या शासकीय अधिकृत संकेतस्थळावर देखील उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. तसेच याबाबतीत अपिलार्थी हे स्वतःही दिव्यांग संवर्गातील असून, मागितलेल्या माहितीत कुठलाच वैयक्तीक हेवादावा आढळून येत नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे निर्देश जारी करण्यात येत आहेत. तसेच महाराष्ट्र शासनाचे सर्व विभाग, खाती तसेच शासनाच्या अखत्यारितील विविध प्राधिकरणे यात अनेक संवर्गातून पद भरती केल्या जातात. त्यातून ज्या ज्या संवर्गासाठी ज्या जागा राखीव आहेत तेथे पात्र व सुयोग्य उमेदवार यांची निवड होते किंवा कसे, याची पदभरती करणाऱ्या संस्थेव्यतिरिक्त सार्वजनिक अंकेक्षण **(Public Audit)** होणे आवश्यक होण्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना देखील याबाबतीत संवर्ग निहाय माहिती करीत असतांना व विशेषतः ज्यांना विशेष सूट दिल्या जात आहेत अशा संवर्गाविषयी म्हणजेच दिव्यांग, क्रिडा व इतर तत्सम यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे इत्यादीबाबत मागील काही वर्षापासून उद्भवलेले वाद तसेच काही प्रकरणांध्ये खोटे किंवा दिशाभूल करणारी प्रमाणपत्रे सादर करण्याच्या घडलेल्या घटना लक्षात घेता, अशा संवर्गामधील व्यक्तींनी सादर केलेली प्रमाणपत्रे ही त्यांच्या नियुक्ती आदेशाबरोबरच सार्वजनिक संकेतस्थळावरच उपलब्ध करुन देण्याबाबत प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत. यास्तव तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहेत.

याशिवाय अपिलार्थी श्री.निंबाळकर यांनी निवडणुकीमध्ये झालेला खर्च, सार्वजनिक बांधकाम विभागाने हाती घेतलेली विकास कामे, त्यावर झालेला खर्च इत्यादी बाबीं बाबत देखील बरीचशी माहिती मागितली असल्याचे आढळून येते. याशिवाय अनेक पंचायत समिती व ग्रामपंचायत येथे प्राप्त झालेला निधी व त्याचा झालेला विनियोग या संदर्भात देखील माहिती मागितली असल्याचे आढळून येते. या सर्व प्रकरणांमध्ये अपिलार्थीनी माहितीचे अवलोकन करण्याचे निर्देश देण्याबाबत विनंती केलेली आहे.

यातील बहुसंख्य प्रकरणांमध्ये जन माहिती अधिकाऱ्यांनी अपिलार्थी हे जन माहिती अधिकाऱ्यांच्या प्रतिसादाला कुठलाही सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत. तसेच अपिलिय अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर माहिती देण्याचे निर्देश असतानाही माहिती प्राप्त करण्याविषयी तसेच शुल्क प्राप्त करण्याविषयी कुठलाही उत्साह दाखवत नसल्याचे नमूद केलेले आहे.

अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार बहुतांशी प्रकरणात जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली असून अपिलीय अधिकाऱ्यांनी बऱ्याचशा प्रकरणात अवलोकन देण्याचे निर्देश जारी केल्यानंतरही माहिती अवलोकनार्थ सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे नाईलाजाने त्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणावर द्वितीय अपील अर्ज दाखल करावे लागत आहेत.

अपिलार्थीच्या म्हणण्यानुसार माहिती उपलब्ध असताना **महाराष्ट्र माहितीचा अधिकार सुधारणा अधिनियम, २०१२ यातील कलम ३ (क)** नुसार माहिती अर्ज नसल्याचे तसेच मागितलेली माहिती अतिशय व्यापक, विस्तृत स्वरूपाची असून त्यासाठी प्रमाणाबाहेर मनुष्यबळ वळवावे लागत असल्याने **कलम ७ (९)** नुसार सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामुग्री या कामासाठी वळवावी लागत असल्याचे कारण देत त्यांना माहिती नाकारण्यात आलेली आहे.

अपिलार्थीनी अंतिमतः मागितलेल्या माहितीचा वापर त्यांनी अनेक प्रकरणांमध्ये माननीय न्यायालयात याचिका दाखल केली असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि, त्याचा कुठलाही तपशील अपिलार्थीनी सादर केलेला नाही.

अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या अपील अर्जांचा आढावा घेतला असता यातील बऱ्याचशा प्रकरणांमध्ये मागितलेली माहिती ही **कलम ४ (१) (ख) मधील १७ मुद्द्यांची माहिती** स्वतःहून उघड करणे, ती नियमितपणे अद्यावत करणे, विशेषतः सार्वजनिक विकासाची कामे, त्यासाठी झालेला निधीचा विनीयोग, अवलंबलेली प्रक्रिया या अनुषंगाने सार्वजनिक अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करून देणे हे सर्वच प्राधिकरणांचे कर्तव्य असून माहिती अधिकाराचा मूळ गाभा हा देखील अधिकाधिक माहिती स्वतःहून म्हणजेच स्वयंप्रेरणेने **(Sumoto Disclosure) आणि (Proactive Disclosure)** यादृष्टीने आवश्यक आहे.

**माहिती अधिकाराच्या प्रस्तावनेचे अवलोकन केल्यास त्यात खालील प्रमाणे नमूद केलेले आहे:-**

**सुप्रशासननासाठी (Good Governance) लोकसहभाग पारदर्शकता व प्रशासकीय उत्तरदायित्व आवश्यक आहे. शासकीय कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता आणणे व उत्तरदायित्व निर्माण करण्याच्या दृष्टीने भारतीय संसदेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ पारित करून शासकीय / सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील व निर्णय प्रक्रियेतील माहिती सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे व क्रांतिकारी पाहून उचलले आहे. नागरिकांना माहितीचा अधिकार मिळवून देणे आणि प्रशासनात पारदर्शकता, उत्तरदायित्व निर्माण करून नागरिकांचे सक्षमीकरण करणे व भ्रष्टाचार, अनियमितता व गैरव्यवहारासस आळा घालणे, ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याची प्रमुख उद्दिष्टे आहेत.**

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ या कायद्याच्या अंमलबजावणीतील महत्त्वाची यंत्रणा म्हणून या उक्त अधिनियमाच्या कलम १५ मधील तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ऑक्टोबर २००५ रोजी देशभरात अंमलात आला. त्यानुसार महाराष्ट्रात देखील दि.११ ऑक्टोबर, २०२५ रोजी राज्याची राजधानी मुंबई येथे राज्य माहिती आयोगाची स्थापना करण्यात आली. तथापि, नंतर विकेंद्रीकरणाच्या उद्देशाने मुख्यालया व्यतिरिक्त बृहन्मुंबई, पुणे, नाशिक. छत्रपती संभाजी नगर, नागपूर, अमरावती व कोकण अशी एकूण ७ ठिकाणी राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठांची (benches) स्थापना करण्यात आली आहे.**

**Good Governance requires public participation, transparency and administrative accountability. The Right to Information Act, 2005 has been passed by the Indian Parliament with a view to bringing greater transparency and accountability in government functions. The main objectives of the Right to Information Act, 2005 are to provide citizens with right to information and to empower citizens by creating transparency and accountability in administration and to combat corruption, irregularities and malpractices.**

**The State Information Commission has been established pursuant to the provisions of Section 15 of the Right to Information Act, 2005 as an important mechanism for the implementation of the Act. The Right to Information Act, 2005 came into force on October, 2005 across the country. Accordingly, the State Information Commission was established in Maharashtra on October 11, 2025 in Mumbai. However, later for the purpose of decentralization, in addition to the headquarters, Brihanmumbai, Pune, Nashik. Benches of the State Information Commission have been constituted at seven places namely Chhatrapati Sambhaji Nagar, Nagpur, Amravati and Konkan.**

यात माहितीची पारदर्शकता ही भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाला त्यांच्या यंत्रणा यांना जाब देण्याच्या, उत्तरदायित्व देण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटनामुळे अन्य सार्वजनिक हित संबंधांमध्ये तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालविणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होऊन व संवेदक्षम माहितीची गोपनीयता राखणे या बाबींना बाधा येण्याची शक्यता असल्याने लोकशाहीच्या आदर्शांची परमोच्चता कायम राखताना या परस्परविरोधी हितसंबंधाचा मेळ घालणे हेच

माहिती अधिकार कायद्याचे व माहिती आयोगाचे मुख्य कर्तव्य असून अशा स्वरूपाच्या काही प्रकरणांमध्ये **राज्य माहिती आयोगाच्या खंडपीठांनी खालील प्रमाणे आदेश देखील पारित केलेले आहेत:-**

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर खंडपीठ यांनी खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत:-**

१. एका व्यक्तीने शेकडोच्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज/ अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही, यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालय / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये/ प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

२. अपिलार्थी यांनी अनेक प्राधिकरणाकडे/कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सार्वजनिक प्राधिकरण हे आपले दैनंदिन कामकाज सांभाळुन माहिती अधिकारात माहिती देण्याचे काम करतात. **माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१)** नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत कार्यवाही करणे आवश्यक आहे. मात्र एकाच प्राधिकरणाकडे एका पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सर्व अर्जावर ३० दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांना कार्यवाही करणे शक्य होत नाही. आणि याचा विपरित परिणाम कार्यालयीन दैनंदिन कामकाजावर होतो. अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करणाऱ्या व्यक्तीमुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या प्रभावी अंमजबजावणीस गतीरोध निर्माण होतो, असे आयोगाचे मत आहे.

३. **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की, "ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत." आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे. आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे. त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

४. आयोगाच्या मते अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय अधिकारी / सार्वजनिक प्राधिकरणांकडे वारंवार अशा प्रकारचे माहिती अर्ज विस्तृत, दिर्घकालावधीची, मोघम, निरर्थक माहितीची मागणी केल्यास **माहिती अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा बेदकारपणे दुरुपयोग होऊन निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे.

५. माहिती कायद्यामध्ये माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी माहितीचा मूळ उद्देश हा आहे की, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय

कामात कार्य तत्परता असावी असा आहे. वारंवार एकाच विषयावर माहिती अर्ज करुन शासकीय यंत्रणेस वेठीस धरण्याचा अपिलार्थी यांचा हेतू असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे शासकीय कामात अडथळा निर्माण होतो. तसेच शासकीय कामकाजावरही विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो.

६. तसेच अशा प्रकरणासंबंधात **मा. सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील ६४५४/२०११, दि.०९.०८.२०११ रोजी या प्रकरणी Applicants Central Board of Secondary Education & Anr. vs. Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-**

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spend 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

एकाच व्यक्तीने मोठ्या प्रमाणावर केलेल्या माहिती अर्जामुळे शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

७. तसेच अपिलार्थी यांचा माहिती अर्ज पाहता, त्यांनी विस्तृत व मोघम स्वरुपाची माहिती मागितल्याचे दिसून येते. याबाबत **मा. उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दि.२७.०१.२००९ मध्ये खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत :-**

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to

impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

८.अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या सर्व द्वितीय अपील प्रकरणात अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, नमूद करण्यात येते की, याबाबत केंद्रीय माहिती आयोगाने एस.के.लाल विरुध्द रेल्वे मंत्रालय (अपील क्र.सीआयसी/ओके/ए/२००६/००२६८-२७२, दि.२९.१२.२००६) प्रकरणात संबंधित अपिलार्थीने रेल्वे प्राधिकरणाकडे दाखल केलेल्या पाच माहिती अर्जाद्वारे रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्ग यांची संपूर्ण / सर्व अभिलेखे याबाबत माहिती मागितल्या प्रकरणी निकाल पारित करताना **खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविलेले आहे :-**

केंद्रीय माहिती आयोगास प्रस्तुत प्रकरणी असे निदर्शनास आले की, **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** हा जरी नागरीकांना, **कलम ८** वगळण्यात आलेल्या १० बाबीं शिवाय इतर, अशी कोणतीही माहिती प्राप्त करुन घेण्याचा अधिकार प्रदान करीत असला तरी, याचा अर्थ असा नव्हे की, संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी अशा प्रकारच्या क्षुल्लक व अर्थहीन माहिती अर्जाची दखल घ्यावी. उपरोक्त प्रकरणी असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहिती आयोगाची धारणा आहे की, रेल्वे विभागाच्या विविध सेवा व कर्मचारी वर्गाची संबंधित यांची संपूर्ण / सर्व अभिलेख यांच्या माहितीची मागणी करणे हे केवळ माहिती अधिनियमाची थट्टा उडविणे आहे.

९. याबाबत **केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दि.०४.०७.२०१४** रोजी पारित केलेल्या **आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-**

Earlier Observation of CIC: Shri.M.M.Ansari

In several occasions earlier the central information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat, (Decision No.246/IC(A)2006, F No.CIC/MA/A/2006/00374 & 375 dated 28 August 2006) the applicant sought documents and specific comments of CPIO on 89 queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest, was dominant, as the appellant had sought redressed of grievances.

**IN Shri Gopal Soni V The New India Assurance Company Ltd.**

(F.No.CIC/AT/A/2008/00097, 000116, 000124, dated 12.06.2008) learned **Commissioner Shri A.N.Tiwari** dealt with similar problem. The respondents in the case submitted that the appellant, their employee, was suspended for insubordination and misconduct, and ever since be directed a spate of application containing queries for detailed, voluminous but inane information which would have to be collected and collated from over 30 branches. The Commission held in this case "answering the elaborate and detailed queries, which have to be both accurate and authentic, imposes heavy cost on the public authority and tends to divert its recourses, which brings it within the scope of **section 7 (9)** of RTI Act"

१०. तसेच **मा. शैलेश गांधी** यांनी नमूद केले आहे की, अपिलार्थी हे **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** चा उपयोग कायदेशीर हत्यार म्हणून करीत आहे. जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत **खालीलप्रमाणे नमूद केले आहे :-**

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned **Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/2011/000760, CIC/SM/2011/ 000926/SG, CIC/SM/A/2011/001111/SG, CIC/SM/A/2011/002909, dated 17th January, 2012)** in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information.... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, it cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him.... The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission, is wasting public resources."

११. तसेच नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांच्या अंतस्थ व्यक्तिगत हेतू साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

१२. यावरुन माहिती अधिकार कायद्यातंर्गत पुन्हा पुन्हा माहितीची मागणी केल्याने जन माहिती अधिकारी अपिलाशी संबंधित कर्मचारी, सार्वजनिक प्राधिकरण, प्रथम अपिलीय अधिकारी यांना त्यांचा मौल्यवान वेळ इतर शासकीय कामकाज करण्यासाठी देणे शक्य होत नाही. तसेच पुन्हा तोच विषय द्वितीय अपिलापर्यंत आल्यास माहिती आयोगाला क्रमवारीनुसार प्राप्त झालेल्या इतर द्वितीय अपिलांच्या सुनावणीसाठी वेळ देणे शक्य होत नाही.”

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांनी खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत :-**

१. **माहिती अधिकार अधिनियम, २००५** मध्ये नमूद तरतुदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन **माहिती अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने अनेक सार्वजनिक प्राधिकरणांकडे जाणीवपूर्वक अतिविस्तृत,

दिर्घकालावधीची, मोघम स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.

२. अपिलार्थी यांनी **माहिती अधिकार अधिनियम, २००५** चा वापर करून मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केले नाही. याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीत त्यांना संधी दिली असता ते याबाबत काही सांगू शकले नाहीत. यावरून त्यांच्या या कृतीशी कोणतेही व्यापक सार्वजनिक हित निगडीत नाही आणि ती या अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद केलेल्या तत्त्वाशी विसंगत आहे ही बाब स्पष्ट आहे.

३. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (**माहिती अधिकार**) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिर्बंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे.

४. अपिलार्थी यांनी **माहिती अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर केला असल्याने संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे.

५. अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन **माहिती अधिकार अधिनियम, २००५** च्या **प्रभावी अंमलबजावणीस** गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.”

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, नाशिक खंडपीठ यांनी खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत :-**

१. अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी ज्या प्रकरणांत अवलोकनासाठी कळविण्यात आलेले आहे त्या प्रकरणांत अपिलार्थी हे अवलोकनासाठी उपस्थित राहिलेले नाहीत. म्हणजेच अपिलार्थी माहिती मिळण्यापासून वंचित राहण्यासाठी स्वतः जबाबदार आहेत व त्यांचा माहिती मिळविण्याचा कोणताही हेतू नाही हे दिसून येते.

२. अपिलार्थी यांनी माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्ज सादर केल्याच्या रजिस्टर पोस्टाच्या ज्या पावत्यांच्या छायांकित प्रती आयोगास सादर केलेल्या आहेत त्यावरुन त्या कोणत्या माहिती अर्जाच्या व कोणत्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने आहेत याचा कोणताही स्पष्ट उल्लेख अपिलार्थी यांनी लेखी निवेदनात केलेला नसल्यामुळे त्याबाबत कोणताही उलगडा होत नाही.

३. अपिलार्थी यांनी सर्व प्रथम अपिलांमध्ये एकच कारण नमूद केले असून सर्व प्रथम अपिलांमध्ये एकसारखी वस्तुस्थिती असू शकत नाही.

४. अपिलार्थी यांनी द्वितीय अपिलाची कारणे यामध्ये माहिती देण्यास सर्रास टाळाटाळ, अनियमितता आल्याच्या दाट शक्यता, माहिती संकलित करुन निःशुल्क पुरवावी असे सर्व द्वितीय अपिलांमध्ये नमूद केलेले असून उपलब्ध कागदपत्रे पाहता अशी वस्तुस्थिती दिसून येत नाही.

५. अपिलार्थी यांनी सर्व द्वितीय अपिलांमध्ये माहिती देण्यास सर्रास टाळाटाळ, अनियमितता झाल्याच्या दाट शक्यता असे कारण नमूद केलेले असून सर्व द्वितीय अपिलांमध्ये एकसारखी वस्तुस्थिती असू शकत नाही यावरुन अपिलार्थी यांनी आयोगाकडे द्वितीय अपिल करण्यासाठीची दिलेली कारणे चुकीची असल्याचे स्पष्ट होते.

६. अपिलार्थी यांनी काही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे तर काही जन माहिती अधिकारी यांनी माहिती निरंक असल्याचे कळविले आहे. तसेच बहुतांशी जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अवलोकनाबाबत कळविले असतांना अपिलार्थी यांनी माहिती देण्यास सर्रास टाळाटाळ असे सर्व द्वितीय अपिलांमध्ये जे कारण नमूद केले आहे ते चुकीचे असल्याचे दिसून येते.

७. अपिलार्थी यांगी मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरविणे म्हणजे सार्वजनिक प्राधिकरणाच्या पर्यायाने जनतेच्या पैशाचा दुरुपयोग होईल.

८. अपिलार्थी यांनी सुनावणीवेळी समक्ष व लेखी युक्तीवाद सादर करुन असे नमूद केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी २० दिवसांत माहिती द्यावी असे आदेश दिलेले आहेत. अपिलार्थी यांनी युक्तीवादात जे म्हणणे सादर केले ते सिध्द करण्याची जबाबदारी ही अपिलार्थी यांची आहे. अपिलार्थी यांनी ते सिद्ध सिद्ध न करता आयोगाने प्रथम अपिलाच्या आदेशाच्या प्रत्तो प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडून घ्याव्यात असे म्हणणे म्हणजे अपिलार्थी यांनाच त्यांच्या संबंधित द्वितीय अपिलाच्या संदर्भातील प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या आदेशाबाबतची माहिती नाही किंवा अपिलार्थी प्रथम अपिल आदेशाची प्रत आयोगास सादर करण्याची टाळाटाळ करीत आहे. यावरुन अपिलार्थी प्रचलित कायद्याचा दुरुपयोग करीत आहे हे स्पष्ट होते.

९. अपिलार्थी हे **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी वापर करत असून शासकीय अधिकारी / कर्मचारी कार्यालय यांना वेठीस धरीत असल्याचे स्पष्ट होते.

१०. अपिलार्थी यांचेकडून **माहिती अधिकार अधिनियम, २००५** या कायद्याचा अमर्याद व अवाजवी वापर करणे हे वर्तन अशोभनीय असून यापुढे असे द्वितीय अपिले आयोगाकडे दाखल केल्यास त्याची चौकशी करुन खोट्या कारणांसह द्वितीय अपिल दाखल केले असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांच्याविरुध्द आयोगाला योग्य ती कार्यवाही करणे क्रमप्राप्त राहील.

११. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (**माहिती अधिकार**) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक आहे किंबहुना असेच कायद्यास अभिप्रेत आहे. कोणताही अधिकार हा अमर्याद स्वरुपात कोणत्याही कायद्याचा व्यवस्थेत (**Legal System मध्ये**) असू शकत नाही. कारण अमर्याद अधिकार याचा वापर अमर्याद जबाबदारी निर्माण करील अशी आयोगाची धारणा आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अधिकार कायद्याचा अनिर्बंध व अवाजवी उपयोग केल्याचे दिसून येते. परिणामी सार्वजनिक प्राधिकरणांवर अमर्याद जबाबदारी निर्माण होत आहे.

१२. उपरोक्त विवेचनांवरुन सर्व द्वितीय अपिले फेटाळणे क्रमप्राप्त आहे.

वरील सर्व विवेचनावरून अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या सर्व अपील अर्जावर प्रथमदृष्ट्या तथ्यहीन असून माहिती अधिकाराचा दुरुपयोग असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट करत ही बाब लक्षात घेता प्रस्तुत सर्व द्वितीय अपील अर्ज हे गुणवत्ताहीन असल्याने **खारीज करण्यात येत आहेत.**

तसेच माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी **6454/2011 CBSE v/s. Aditya Bandopadhya या प्रकरणात परिच्छेद ६२ व ६७ मध्ये खालील प्रमाणे नमूद केलेले आहे :-**

**"The Supreme Court in CBSE vs. Aditya Bandopadhyay, (2011) 8 SCC 497, has held as under:**

**62. When trying to ensure that the right to information does not conflict with several other public interests (which includes efficient operations of the Governments, preservation of confidentiality of sensitive information, optimum use of limited fiscal resources, etc.), it is difficult to visualize and enumerate all types of information which require to be exempted from disclosure in public interest. The legislature has however made an attempt to do so. The enumeration of exemptions is more exhaustive than the enumeration of exemptions attempted in the earlier Act, that is, Section 8 of the Freedom to Information Act, 2002. The courts and Information Commissions enforcing the provisions of the RTI Act have to adopt a purposive construction, involving a reasonable and balanced approach which harmonizes the two objects of the Act, while interpreting Section 8 and the other provisions of the Act.**

**67. Indiscriminate and impractical demands or directions under the RTI Act for disclosure of all and sundry information (unrelated to transparency and accountability in the functioning of public authorities and eradication of corruption) would be counterproductive as it will adversely affect the efficiency of the administration and result in the executive getting bogged down with the nonproductive work of collecting and furnishing information. The Act should not be allowed to be misused or abused, to become a tool to obstruct the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty. The nation does not want a scenario where 75% of the staff of public authorities spends 75% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and the pressure of the authorities under the RTI Act should not lead to employees of a public authorities prioritizing "information furnishing", at the cost of their normal and regular duties."**

तसेच **माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी आयसीएआय विरुद्ध शौनक एच. सत्या या प्रकरणात खालील प्रमाणे निरीक्षण नोंदवलेले आहे :-**

We however agree that it is necessary to make a distinction in regard to information intended to bring transparency, to improve accountability and to reduce corruption, falling under Sections

4(1)(b) and (c) and other information which may not have a bearing on accountability or reducing corruption. The competent authorities under the RTI Act will have to maintain a proper balance so that while achieving transparency, the demand for information does not reach unmanageable proportions affecting other public interests, which include efficient operation of public authorities and the Government, preservation of confidentiality of sensitive information and optimum use of limited fiscal resources.

Consequently, this Court deems it appropriate to refuse to exercise its writ jurisdiction. Accordingly, present petition is dismissed. **This Court is also of the view that misuse of the RTI Act has to be appropriately dealt with otherwise the public would lose faith and confidence in this "sunshine Act". A beneficent Statute, when made a tool for mischief and abuse must be checked in accordance with law.** A copy of this order is directed to be sent by the Registry to Defense and Law Ministry, so that they may examine the aspect of misuse of this Act, which confers very important and valuable rights upon a citizen. Filing of multiple RTI on the same subject creates fear among the public authority. The feel tormented by such disgruntled/ retired employees consuming through RTI their precious resource apart from causing mental agony. As observed by the Hon'ble High Court, "a beneficent Statute, when made a tool for mischief and abuse must be checked in accordance with law."

तसेच **मा.कर्नाटक उच्च न्यायालय** यांनी त्यांच्या **WRIT PETITION NO. 101260 OF 2024 Sri Davalsab M. Miyanavar vs Karnataka Information Commission on 25 September, 2024**, या प्रकरणात मोठ्या प्रमाणात दाखल केलेल्या जोडपत्र यात माहिती मिळाली नसल्याचा आक्षेप नोंदवून अपिलार्थी यांनी दाखल केलेले द्वितीय अपील अर्ज हे **मा.कर्नाटक उच्च न्यायालय** यांनी निरस्त केले असून त्या विरुद्ध अपिलार्थी यांनी उपरोक्त याचिका दाखल केली होती. अपिलार्थी यांचे एकूण ९६४६ अर्ज खारीज करीत असताना **मा.कर्नाटक उच्च न्यायालय यांनी या प्रकरणात खालील प्रमाणे आदेश पारित केलेला आहे:-**

**"2.** The petitioner was notified via registered post about the hearing scheduled for 26.07.2023. While the petitioner remained absent, their counsel appeared, filed a vakalatnama, and requested time to submit arguments. After hearing the second appeals, the full bench framed the following key issues:
(i) Whether there is sufficient evidence to show that the appellant is misusing the provisions of the RTI Act? (ii) Whether there is material on record indicating lack of bona fides on the appellant's part in filing these second appeals (iii) Whether any directions in these appeals would adversely affect administrative efficiency or disproportionately divert the resources of the public authorities concerned? (iv) Whether the second appeals listed in Annexures 'A' to 'N' are maintainable under the law? (v) Whether there are reasonable grounds to proceed further with these second appeals? (vi) What order is appropriate?

**3.** After examining the records, the bench concluded that the petitioner had clearly misused and abused the provisions of the RTI Act. The bench noted that the petitioner, who identifies as an RTI activist, sought irrelevant information through reckless appeals. The bench made a positive finding that the petitioner had abused the RTI Act, and further detailed the nature of the information sought by the petitioner from various government epartments across multiple districts.

**4.** The petitioner had filed RTI applications in several districts, including Bagalkot, Bellari, Badami, Bijapur, Bengaluru Urban, Chamrajnagar, Chickmangalur, Chitradurga, Chikkabellapur, Davanagere, Dharwad Dakshin Kannada, Gadag, Hassan, Haveri, Shivamogga, Kalaburagi, Kolar, Kodagu, Mandya, Tumkur, Udupi, Uttar Kannada, and Vijayapura. In total, the petitioner filed 3,736 RTI applications in the Rural Development and Panchayath Raj Department alone, followed by 964 appeals against the Public Works and National Highways Department, 492 against the Department of Horticulture, and numerous other appeals across different departments, as detailed in the case.

**5.** The bench observed that there are 42,898 pending cases before the Commission and relied on several landmark Supreme Court judgments to support its reasoning, including:

**1. CBSE & Another vs. Aditya Bandopadhyay & Others (2011) 8 SCC 497**

**2. Subrata Roy Sahara vs. Union of India (2014) SCC 470**

**3. Institute of Chartered Accountants of India vs. Shaunak H. Satya (2011) 8 SCC 781**

**4. Shail Sahni vs Sanjeev Kumar & Ors. 2014 SCC Online Del 558**

**5. CPIO, Supreme Court of India vs. Subhash Chandra Agarwal (2020) 5 SCC 481**

**6. Canara Bank vs. Shyam (2018) 11 SCC 426**

**7. Girish Ramchandran Deshpande vs. Central Information Commissioner & Ors. (2013) 1 SCC 212**

**8. Khanapuram Gandaiah vs. Administrative Officer & Others (2010) 2 SCC 1**

**6.** Referring to these judgments, the bench concluded that public authorities are not obligated to supply the information sought by the petitioner. The bench further held that the petitioner had abused the RTI Act as a tool, acting without Bonafide intent, and noted that entertaining such applications would harm administrative efficiency and burden public resources. As a result, all the appeals were dismissed.

**7.** Aggrieved by this common order, the petitioner filed a writ petition challenging the dismissal of 9,646 appeals. However, the office raised an objection, stating that the petitioner had not paid the required court fees amounting to Rs.9,64,600/-. When questioned by the court, the petitioner expressed an inability to pay the court fees and indicated a desire to withdraw the petition.

**8.** Heard the counsel for petitioner and counsel appearing for respondent.

**9.** The petitioner, claiming to be an RTI activist, filed multiple applications under Section 6 (1) of the RTI Act across various districts in Karnataka, seeking information from a wide range of public authorities. These applications were filed in departments such as Rural Development, Agriculture, Public Works, Energy, and Water Resources, among others. Despite having filed thousands of cases with the KIC, the petitioner claimed to have received no substantive response from these authorities, leading him to file second appeals.

**10.** The sheer volume of appeals filed by the petitioner prompted the State Chief Information Commissioner to constitute a full bench to address the matter. During the hearings, it was found that the petitioner's applications and appeals were overwhelming in number, lacked specificity, and appeared to be filed without any genuine cause, which raised concerns of abuse of the RTI Act.

**11.** The full bench of the KIC formulated several points for consideration, including whether the petitioner had misused the RTI Act, whether his applications lacked bona fides, and whether allowing such appeals would disproportionately burden public authorities and adversely affect administrative efficiency. After examining the record, the bench observed that the petitioner had indeed misused the provisions of the RTI Act. The commission found that the petitioner had filed thousands of applications seeking voluminous and irrelevant information without a clear rationale, thereby abusing the process intended to promote transparency and accountability.
**12.** The commission cited the **Supreme Court judgment in CBSE & Another vs. Aditya Bandopadhyay & Others 1,** where it was held that the right to information is not an unbridled right and that frivolous or vexatious applications could be rejected. In the present case, the commission found that the petitioner's conduct demonstrated a reckless disregard for the spirit of the RTI Act, with applications being filed solely to burden the public authorities.
**13.** The RTI Act is a tool designed to empower citizens by providing access to information held by public authorities. However, several judicial pronouncements have recognized the potential for misuse of the Act. **The Supreme Court, in Khanapuram Gandaiah vs. Administrative Officer and Others2,** emphasized that the RTI Act should not be used as a means of harassment or to serve personal vendettas. It was held that the Act is not meant to facilitate 1(2011) **8 SCC 497 2 (2010)2 SCC 1** fishing inquiries into irrelevant or frivolous matters. The petitioner in the present case filed thousands of RTI applications and appeals, many of which sought irrelevant information, thereby misusing the Act as a tool of harassment.
**14.** Similarly, in Institute of Chartered Accountants of **India vs. Shaunak H. Satya 3**, the Supreme Court reiterated that the purpose of the RTI Act is to secure access to information that is in the public interest and should not be employed to flood public authorities with frivolous queries, which would divert their attention and resources from their core functions.
**15.** Further, the **Delhi High Court in Shail Sahni vs. Sanjeev Kumar & Ors.4,** observed that the RTI Act should not be misused by filing multiple and repeated applications that serve no public purpose. The court held that misuse of 3. (2011) 8 **SCC 781 4. 2014 SCC Online Del. 558** he Act amounts to an abuse of the legal process and can be discouraged through appropriate judicial intervention.
**16.** In the present case, the KIC found that the petitioner's actions mirrored the concerns highlighted in these judgments. **By filing 9,646** second appeals and burdening multiple departments with irrelevant and unnecessary queries, the petitioner had misused the provisions of the RTI Act to such an extent that it impeded the efficiency of the administration. The commission, citing these judicial precedents, rightly dismissed the appeals on the grounds of abuse of the Act.
**17.** One of the key issues considered by the KIC was the adverse impact of the petitioner's actions on the functioning of public authorities. The commission observed that allowing such frivolous applications and appeals would divert the limited resources of public authorities and impair their ability to efficiently discharge their duties. This observation is supported by the Supreme Court's ruling in Central

Public Information Officer, Supreme Court of India vs. Subhash Chandra Agarwal, wherein it was held that while the RTI Act is a powerful instrument, it should not result in disproportionately burdening public resources or obstructing administrative functioning."

असे असले तरी माननीय सर्वोच्च न्यायालय यांनी **किशनचंद जैन विरुद्ध युनियन ऑफ इंडिया WP (civil) ९९०/२०२१** या प्रकरणात दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या निर्णयात सर्वच प्राधिकरणांनी **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम ४ (१)** अन्वये जास्तीत जास्त माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याविषयी सर्वच प्राधिकरणांना स्पष्ट निर्देश दिले असून ते सर्वच प्राधिकरणांवर बंधनकारक आहेत. तसेच माननीय मुख्यमंत्री यांनीही प्रशासनाने **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (च)** प्रमाणे देय असलेली अधिकांश माहिती ही स्वतःहून सर्वच नागरिकांनी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याविषयी सुस्पष्ट निर्देश दिले असून त्याच अनुषंगाने राज्य माहिती आयोगाने **माहितीचा अधिकार अधिनियम, २००५** यातील **कलम २५ (५)** प्रमाणे दिनांक २९/०४/२०२५ रोजी स्वयंस्पष्ट निर्देश दिले असून सर्व अपिलार्थींना त्यांच्या **जोडपत्र अ व ब** च्या अनुषंगाने प्रदान करण्यात आलेली माहिती ही देखील स्वतःच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याविषयी सुस्पष्ट निर्देश दिलेले आहेत. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील **कलम ४ (१), ४ (२), ४ (३) व ४ (४) यात खालील प्रमाणे नमूद केलेले आहे :-**

**४. (१) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण, --**

(क) या अधिनियमान्वये देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रीतीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख योग्य रीतीने सूचिबद्ध करील आणि त्याची निर्देशसूची तयार करील आणि ज्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे, अशा सर्व अभिलेखांचे वाजवी कालावधीत आणि साधनसंपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे याची आणि असे अभिलेख पाहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणून संपूर्ण देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत ते जोडले जात आहेत, याची खातरजमा करील.

(ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत, --

(एक) आपली रचना, कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील;

(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये;

(तीन) निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपद्धती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली;

(चार) स्वतःची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके;

(पाच) त्याच्याकडे असलेले किंवा त्याच्या नियंत्रणात असलेले किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारीवर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका आणि अभिलेख;

(सहा) त्याच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण;

(सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील;

(आठ) आपल्या एक भाग म्हणून किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटित केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळून बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण; आणि त्या मंडळांच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे किंवा अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण;

(नऊ) आपल्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची निर्देशिका;

(दहा) आपल्या प्रत्येक अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला मिळणारे मासिक वेतन; तसेच प्राधिरणाच्या विनियमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे नुकसानभरपाई देण्याची पद्धती;

(अकरा) सर्व योजनांचा तपशील, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमून दिलेला अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल;

(बारा) अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभाधिकाऱ्यांचा तपशील;

(तेरा) ज्या व्यक्तींना सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील;

(चौदा) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्याच्याकडे असलेल्या माहितीच्या संबंधातील तपशील;

(पंधरा) माहिती मिळविण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असणाऱ्या सुविधांचा तपशील, तसेच सार्वजनिक वापरासाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजाच्या वेळांचा तपशील;

(सोळा) जन माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदनामे आणि इतर तपशील;

(सतरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती;

प्रसिद्ध करील आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्ययावत करील;

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्त्वाची धोरणे आखताना आणि असे निर्णय जाहीर करताना सर्व संबंधित वस्तुस्थिती प्रसिद्ध करील;

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायिकवत् निर्णयांबाबतची कारणे बाधित व्यक्तींना कळवील.

**(२)** माहिती मिळवण्यसाठी लोकांना या अधिनियमाचा कमीतकमी आधार घ्यावा लागावा यासाठी, नियमित कालांतराने, लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वतःहून माहिती पुरविण्यासाठी, पोटकलम (१) च्या खंड (ख) च्या आवश्यकतांनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशील राहील.

**(३)** पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, प्रत्येक माहिती, विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल.

**(४)** पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन, सर्व माहिती प्रासारित करण्यात येईल आणि यथास्थिति, केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे, शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

**स्पष्टीकरण. -** पोटकलम (३) आणि (४) च्या प्रयोजनार्थ, "प्रसारित" याचा अर्थ, सूचनाफलक, वृत्तपत्रे, जाहीर घोषणा, प्रसारमाध्यमांकडून ध्वनिक्षेपण, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे, तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे, असा आहे.

यात जास्तीत जास्त माहिती ही लोकांना विनामूल्य मिळण्यासंदर्भात तसेच या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागणे असे अपेक्षित असून अपिलार्थीनी मोठ्या प्रमाणात दाखल केलेले अपील अर्ज या संदर्भात विविध जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांनी घेतलेले आक्षेप यात प्रथमदर्शनी तथ्य असले तरी, सार्वजनिक प्राधिकरणांनी केलेली निवड प्रक्रिया यात पारदर्शकता असणेही आवश्यक असून दिव्यांग संवर्गातून शासकीय सेवेत रुजू झालेल्या उमेदवारांविषयी मागितलेली माहिती ही प्रथम दर्शनी **कलम ८ (१) (त्र)** अन्वये उघड करणे योग्य होणार नसल्याचा काही प्राधिकरणानी दिलेला प्रस्ताव, दिलेला प्रतिसाद हा ती उघड केल्याने साध्य होणारे व्यापक जनहित अधिक व्यापक असल्याने **कलम ८ (२)** मध्ये नमूद केल्याप्रमाणे अशी माहिती उघड करण्याची कायद्यातील तरतूद लक्षात घेता तसेच माहिती प्रकट केल्याने उघड होणारे, साध्य होणारे लोकहित हे संरक्षित हितसंबंधाच्या होणाऱ्या हानीपेक्षा अधिक असेल तर अशा प्रकारची माहिती विशेषतः शासकीय सेवा, त्यात झालेली भरती, दिव्यांग व इतर संवर्गात उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार देण्यात आलेली सूट याबाबतीत अशा पदांवर नियुक्त झालेले उमेदवार हे त्या संवर्गातच असल्याविषयी खातरजमा करण्यासंदर्भात दाखल केलेले माहिती अर्ज यावर ही माहिती वैयक्तिक स्वरूपाची असल्याचे दिलेले सर्व प्रतिसाद हे माहिती अधिकार अधिनियमाशी व पारदर्शकतेच्या तत्त्वाशी पूर्णपणे विसंगत असून ती सर्व कागदपत्रे ही सर्वच शासकीय प्राधिकरणांनी व ज्या शासकीय विभाग यांनी दिव्यांग संवर्गातील उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे त्यांनी स्वतःच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे.

किंबहुना आज झालेल्या सुनावणीत दिव्यांग संवर्गातील उमेदवार हे विविध कार्यालयांमध्ये कार्यरत असले तरी, प्रत्यक्षात त्यांची नियुक्ती ही त्याच कार्यालयामध्ये, त्याच विभागाने केलेली असतेच असे नाही. किंबहुना त्यातील बऱ्याचशा व्यक्ती या बदल्या, प्रतिनियुक्ती व त्यांच्या शारीरिक व्याधी वा इतर कारणांमुळे वेगवेगळ्या स्थळी कार्यरत असताना अशा प्रकारच्या माहिती अर्जांवर कुठल्याच प्रकारचा सुस्पष्ट प्रतिसाद देणे हे शक्य होत नसते असेही नमूद केलेले आहे. त्यामुळे या संदर्भात दिव्यांग कल्याण मंत्रालय तसेच दिव्यांग आयुक्त यांनी या संदर्भातील शासनाच्या विविध खात्यांतर्गत तसेच शासकीय अनुदान पात्र संस्थांमध्ये दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे भरती, पदोन्नती इत्यादी प्राप्त केलेल्या उमेदवारांचा एक सर्व समावेशक असा डेटाबेस संकलित केल्यास व तो त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर राज्य शासन त्याच्या अखत्यारीतील सर्व प्राधिकरणे, तेथे कार्यरत दिव्यांग अधिकारी व कर्मचारी यांची माहिती या शीर्षकांतर्गत उपलब्ध करून देण्यास अपिलार्थी श्री.निंबाळकर यांच्याप्रमाणेच अशा प्रकारचे अर्ज दाखल करणाऱ्या अनेक अपिलार्थी यांना कुठलेही अर्ज दाखल करावे लागणार नाहीत.

तरी, याबाबतीत दिव्यांग कल्याण विभागाचे विद्यमान मा.सचिव यांनी प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचनेसह तसेच अपिलार्थिनी दाखल केलेले वरील सर्व अपील अर्ज यातील ज्या माहिती

अर्जांवर या आधीच प्रतिसाद दिलेला आहे व माहिती प्रदान केलेली आहे असे वगळता ज्या प्रकरणांमध्ये **कलम ४ (१) (ख) ४ (२), ४ (३)** अन्वये जी माहिती देय आहे व जी माहिती **माहिती अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २ (च)** अनुसार माहिती या शब्दाच्या व्याख्येत मोडत आहे त्यातील **कलम ८, ९** यांचा अपवाद वगळता सर्वच प्राधिकरणांनी स्वतःच्या संकेतस्थळावर सर्वच नागरिकांसाठी तात्काळ उपलब्ध करून देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत सर्व अपील अर्ज या संयुक्त आदेशासह निकाली काढण्यात येत आहेत.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपील क्र.CIC- ०१७०/२०२६ ते ०१८१/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

**स्वाक्षरीत/-**

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : २७.०४.२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :**

**१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**२. मा.सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**